# स्वातंत्र्यवीर सावरकर स्मारकाच्या अध्यक्षपदी प्रवीण दीक्षित यांचा एकतर्फी विजय

## दीपक टिळक यांचा १३७ वि. २ असा पराभव

**मुंबई,दि. २६ (प्रतिनिधी):** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या रविवार, दि. २६ डिसेंबर या दिवशी झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत माजी पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित यांनी मोठा विजय मिळवला आहे. या निवडणुकीत त्यांनी काँग्रेसनिष्ठ दीपक टिळक यांचा पराभव केला.

यावेळी स्मारकाच्या सदस्यांनी सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत मतदान केले. यामध्ये दीक्षित यांना १३७ मते मिळाली, तर दीपक टिळक यांना अवघी दोन मते मिळाली.

स्मारकाचे कार्य उत्तमरीत्या चालू असून ते अधिक उंचीवर नेण्याचा निर्धार दीक्षित यांनी केला होता. त्यांच्या या निर्धाराला आणि उमेदवारीला स्मारक सदस्यांनी भरघोस मते देऊन आपले जोरदार समर्थनच दिले आहे.

टिळक यांनी सावरकर स्मारकाच्या संबंधात केलेल्या आरोपांमुळे या निवडणुकीने अनेकांचे लक्ष वेधले होते. मात्र, आता स्मारक सदस्यांनी केलेल्या मतदानातून टिळक यांच्या आरोपांना सदस्यांनी पूर्णपणे फेटाळून लावल्याचे स्पष्ट झाले आहे. या निवडणुकीत मतदानासाठी टिळक स्वत: उपस्थितही राहिले नव्हते.

निवडणुकीसाठी निवडणूक अधिकारी म्हणून शिवराज्याभिषेक दिनोत्सव समितीचे अध्यक्ष सुनील पवार तर त्यांचे साहाय्यक म्हणून किरण शिंदे आणि राजेंद्र देसाई यांनी काम पाहिले.

**मुंबई :** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारकाच्या अध्यक्षपदाची निवडणूक रविवार, दि. २६ डिसेंबर या दिवशी झाली. त्यावेळी डावीकडून स्मारकाचे मावळते अध्यक्ष डॉ. अरुण जोशी आणि उजवीकडे नवे अध्यक्ष प्रवीण दीक्षित.

# माझ्यावरील हल्ला हा सुनियोजित कट

- गोपीचंद पडळकरांचा दावा
- जयंत पाटील आणि पोलीस प्रशासनावर गंभीर आरोप

**मुंबई, दि. २६ (प्रतिनिधी):** नोव्हेंबर महिन्यात आटपाडीतून जात असताना माझ्यावर झालेला हल्ला हा सुनियोजित कट असल्याचा दावा भाजपचे विधानपरिषदेचे आमदार गोपीचंद पडळकर यांनी रविवार, दि. २६ डिसेंबर रोजी एका व्हिडिओच्या माध्यमाने केला. राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे जलसंपदामंत्री जयंत पाटील आणि पोलीस प्रशासनाने हा हल्ला घडवून आणल्याचा खळबळजनक आरोप गोपीचंद पडळकर यांनी यावेळी करताना वैयक्तिक सुरक्षारक्षक न स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.

### माझ्यावरील हल्ल्याचा सुनियोजित कट

गोपीचंद पडळकर म्हणाले की, ''दि. ७ नोव्हेंबर रोजी माझ्यावर हल्ला करण्यात आला. हा हल्ला सुनियोजित होता. माझी गाडी ज्या दिशेने येत होती त्याच्या बरोबर दुसऱ्या बाजूने २०० ते ३०० लोकांचा जमाव लाठ्या-काठ्यांसह उभा होता. पहिल्यांदा माझ्या गाडीवर दगडफेक करायची. यानंतर माझ्या गाडीची स्पीड कमी होताच भरधाव वेगाने ट्रक अंगावर घालायचा आणि यानंतर जमावाकडून हल्ला करून घ्यायचा असा सुनियोजित कट आखण्यात आलेला होता,'' असा दावा गोपीचंद पडळकर यांनी केला आहे.

### जयंत पाटील आणि पोलीस अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप

गोपीचंद पडळकर यांनी म्हटले की, ''या हल्ल्याच्या कटात सांगली जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक दीक्षितकुमार गेडाम, अतिरिक्त पोलीस अधीक्षक मनीषा डुबुले आणि जिल्ह्याचे पालकमंत्री जयंत पाटील पूर्णपणे सामील आहेत. त्यांनी या कारवाईच्या नावाखाली माझ्या सुरक्षारक्षकालाच निलंबित करत माझ्यावरच ३०७ अंतर्गत गुन्हा दाखल केला,'' असा आरोप पडळकर यांनी यावेळी केला.

### 'बॉडीगार्ड' न स्वीकारण्याचा निर्णय

पोलीस अधीक्षक आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक यांच्यावरील विश्वास उडाला असल्याचे पडळकर यांनी म्हटले. ''याच कारणामुळे मी 'बॉडीगार्ड' न स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे. रक्षकच जर भक्षकात सामील असतील तर त्यांच्यावरती कसा विश्वास ठेवायचा,'' असे म्हणत त्यांनी सांगली पोलीस अधिकाऱ्यांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

### चांदीवाल आयोगाकडून 'आरटीपीसीआर' अनिवार्य

**मुंबई :** मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमवीर सिंग यांनी माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर केलेल्या आरोपांच्या चौकशीसाठी न्या. के. यू. चांदीवाल यांच्या नेतृत्वात स्थापन करण्यात आलेल्या एकसदस्यीय आयोगाने सुनावणीसाठी उपस्थित राहणाऱ्या प्रत्येकासाठी 'आरटीपीसीआर' चाचणी अनिवार्य केली आहे. १५ दिवसांपूर्वीचा नकारात्मक कोरोना अहवाल ग्राह्य धरला जाईल. सर्वांच्या सुरक्षेसाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे न्या. चांदीवाल यांनी सांगितले. दि. २४ डिसेंबर रोजी साहाय्यक पोलीस आयुक्त संजय पाटील यांची साक्ष नोंदवली जाणार होती. मात्र, त्यांच्या पत्नीची प्रकृती बिघडली असल्याने साक्ष नोंदवण्यासाठी मुदत दिली जावी, अशी माहिती त्यांच्या वकिलाने केल्याने चांदीवाल आयोगाची पुढील सुनावणी शनिवार, दि. ४ जानेवारी, २०२२ रोजी होणार आहे.

# सर्वोत्तम प्रशासन यादीत गुजरात अव्वल; महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर

**मुंबई, दि. २६ (प्रतिनिधी):** देशातील सर्व राज्यांमध्ये प्रशासनाच्या गुणवत्तेनुसार त्यांची यादी दरवर्षी केंद्र सरकारकडून तयार केली जाते. ही यादी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते नुकतीच जाहीर करण्यात आली. या यादीमध्ये देशातील सर्वोत्तम प्रशासनानुसार राज्यांचा क्रम लावण्यात येतो. त्यानुसार गुजरातने एकूण ५८ निर्देशांकांमध्ये उत्तम कामगिरी करीत अव्वल क्रमांक पटकावला असून महाराष्ट्र दुसऱ्या स्थानावर असल्याचे केंद्र सरकारकडून जाहीर करण्यात आले.

या यादीनुसार, गेल्या वर्षभरात जवळपास राज्यांनी त्यांचा 'गुड गव्हर्नन्स इंडेक्स' दर्जा सुधारला आहे. या यादीनुसार गुजरातने २०१९च्या तुलनेत गेल्या वर्षभरात १२.३ टक्क्यांची वाढ नमूद केली आहे. त्यामध्ये आर्थिक प्रशासन, मनुष्यबळ विकास, सार्वजनिक सोईसुविधा, समाज कल्याण आणि विकास, न्यायव्यवस्था, सामाजिक सुरक्षा या क्षेत्रांमध्ये उत्तम कामगिरी केल्याचे नमूद केले आहे.

गुजरात राज्यापाठोपाठ दुसऱ्या क्रमांकावर महाराष्ट्र, तर तिसऱ्या क्रमांकावर गोवा राज्याने स्थान मिळवले आहे. महाराष्ट्राने या दहापैकी शेती आणि जोडधंदे, मनुष्यबळ विकास, सार्वजनिक सोईसुविधा, समाज कल्याण आणि विकास या क्षेत्रांमध्ये चांगल्या प्रशासनाची नोंद केली आहे. राज्यांमध्ये गुजरातप्रमाणेच केंद्रशासित प्रदेशांमध्ये राजधानी दिल्लीने अव्वल स्थान पटकावले आहे.

महाराष्ट्रापाठोपाठ गोव्याने तिसरा क्रमांक पटकावला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत गोव्याने या वर्षी तब्बल २४.७ टक्क्यांची वाढ नोंदवत मोठी झेप घेतली आहे. शेती आणि जोडधंदे, व्यापार आणि उद्योग, सार्वजनिक सोयीसुविधा, आर्थिक प्रशासन समाजकल्याण आणि पर्यावरण या क्षेत्रांमध्ये गोवा राज्याने चांगल्या कामगिरीची नोंद केली आहे. गोव्यापाठोपाठ उत्तर प्रदेश, झारखंड, राजस्थान, मिझोराम, जम्मू-काश्मीर या राज्यांचा क्रमांक लागतो. ही यादी बनवण्यासाठी केंद्राकडून एकूण दहा क्षेत्र आणि त्यातील ५८ निर्देशांकांची तपासणी केली जाते. गुजरातने या सर्व निर्देशांकामध्ये चांगल्या कामगिरीची नोंद केल्याचे केंद्राकडून जाहीर करण्यात आले आहे. तपासल्या जाणाऱ्या दहा क्षेत्रांमध्ये शेती आणि जोडधंदे, व्यापार आणि उद्योग, मनुष्यबळ विकास, सार्वजनिक आरोग्य, सार्वजनिक सोईसुविधा, आर्थिक प्रशासन, समाज कल्याण, न्यायव्यवस्था, सार्वजनिक सुरक्षा, पर्यावरण आणि नागरिक केंद्रित प्रशासन या क्षेत्रांचा समावेश आहे.

# हवामान इशारा; राज्यात मेघगर्जनेसह गारपिटीची शक्यता

**मुंबई, दि. २६ (प्रतिनिधी):** विदर्भ आणि मराठवाड्यात मागील काही दिवसांपासून कडाक्याची थंडी जाणवत आहे. यानंतर येत्या दोन दिवसानंतर मराठवाडा आणि विदर्भात विजांच्या कडकडाटासह पाऊस आणि गारपीट होण्याची शक्यता हवामान खात्याकडून वर्तवण्यात आली आहे. राज्यामध्ये हिवाळ्यात अवकाळी पाऊस आणि गारपिटीची शक्यता निर्माण झाल्याने राज्यातील शेतकऱ्यांवर चिंतेचे सावट आहे.

अतिवृष्टीमुळे खरीप हंगाम वाया गेल्यानंतर, रब्बी हंगामात निर्माण झालेल्या या अस्मानी संकटामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक कंबरडे मोडण्याची शक्यता आहे. सध्या वायव्य आणि मध्य भारतात पश्चिमी चक्रवात आणि त्याच्या चक्राकार वाऱ्याचा प्रभाव जाणवत आहे. त्यामुळे, राज्यातही अनेक ठिकाणी पावसासाठी पोषक हवामान तयार होत आहे. मंगळवार, दि. २८ डिसेंबरपासून राज्यात कोकण वगळता मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात मेघगर्जनेसह जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

उत्तरेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे राज्यात अनेक ठिकाणी तापमानाचा पारा विक्रमी घसरला होता. पण आता, उत्तर भारतात थंडीची लाट ओसरली आहे. त्यामुळे येत्या काळात राज्यातही गारठा कमी होणार आहे. पुढील पाच दिवस देशात कुठेही थंडीची लाट येण्याची शक्यता नाही.

## राज्यपालांच्या अधिकारांमध्ये बदलज संविधानातील तरतुदींशी सुसंगत नाही

**(पान १ वरुन)** बदल केले आहेत. ठाकरे सरकारच्या या निर्णयावर भाजपने अधिवेशनात आक्षेप घेतला होता. त्यानंतर रविवारी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस यांनी राज्य सरकारच्या या निर्णयावर कडाडून टीका केली. ''सर्व अधिकार काढून घ्यायचे आणि 'लेजिसलेचर'मध्ये 'एक्झिक्युटिव्ह'ला अधिक महत्त्व द्यायचे हे योग्य नाही. म्हणून आम्ही त्यास विरोध करतो आहे,'' असे फडणवीस यांनी सांगितले.

## नूतन वर्षात २४ पैकी ६ सुट्ट्या रविवारी!

**(पान १ वरुन)** दोन पौर्णिमा येत नसल्याने 'ब्ल्यू मून' योग मात्र यावर्षी येणार नाही. गणेशभक्तांसाठी दि. १९ एप्रिल आणि दि. १३ सप्टेंबर अशा दोन अंगारकी संकष्ट चतुर्थी आहेत.

## 'ओमिक्रॉन'वर अभ्यास सुरू

**(पान १ वरुन)** असेच होते. जेव्हा ते रुग्णालयात होते, त्यावेळी त्यांनी आपल्या शाळेच्या मुख्याध्यापकांना लिहिलेले एक पत्र समाजमाध्यमांवर 'व्हायरल' झाले. ते पत्र वाचून माझ्या मनात पहिला विचार आला, तो म्हणजे यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही वरुण सिंग जमिनीशी जुडलेले होते. दुसरा विचार आला की, उत्सव साजरा करण्याची वेळ आली तेव्हा ते येणाऱ्या पिढ्यांची काळजी घेत होते. आपण ज्या शाळेत शिकलो त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे जीवनही एक उत्सव व्हावे, अशी त्यांची इच्छा होती, '' असे मोदी यांनी सांगितले.

**CORRIGENDUM TO THE NOTICE OF THE EXTRA ORDINARY GENERAL MEETING (EGM) to be held on 3rd Jan 2022 IST through Video Conferencing (VC) / Other Audio Visual Means (OAVM) OF KOPRAN LIMITED**

The Notice dated 9th December 2021 of the EGM has been dispatched to the shareholders of the Company in due compliance with the provisions of the Companies Act, 2013 read with the relevant rules made thereunder. We refer to Item No. 1 of the Notice of EGM, EXPLANATORY STATEMENT along with Annexure A to be read with additional information as given below which pertains to shareholding pattern of proposed allotee pre and post Preferential issue, there has been a typographical error, Members are requested to kindly take note of this typographical error and corresponding correction. This Corrigendum to the Notice of the EGM shall form an integral part of the Notice of the EGM which has already been circulated to the shareholders of the Company and on and from the date hereof, the Notice of the EGM shall always be read in conjunction with this Corrigendum. This Corrigendum is also being published in the Business standard (in English) and Tarun Bharat (in Marathi) and will also be available on the website of BSE Ltd. (www.bseindia.com), the National Stock Exchange of India Ltd. (www.nseindia.com) and on the website of the Company (www.kopran.com). All other contents of the Notice of the EGM, save and except as modified or supplemented by this Corrigendum, shall remain unchanged

| Sr. No. | Name of Proposed Allottee(s) | Pre Preferential Issue (as on 3.12.2021) |  | Post Preferential Issue (fully diluted) |  |
|---|---|---|---|---|---|
|  |  | No. of Shares | % | No. of Shares | % |
| A | Public |  |  |  |  |
| 1 | Mahima Stocks Pvt Ltd | 0 | 0 | 500000 | 1.04 |
| 2 | Vivek Mundra | 0 | 0 | 100000 | 0.21 |
| 3 | Chaitanya Ramesh Kejriwal | 0 | 0 | 140000 | 0.29 |
| 4 | Siddharth Ramesh Kejriwal | 0 | 0 | 140000 | 0.29 |
| 5 | Viraj Russel Mehta | 343590 | 0.79 | 893590 | 1.85 |
| 6 | Mc Jain InfoServices Pvt Ltd. | 0 | 0 | 200000 | 0.41 |
| 7 | Neelima Karnawat | 0 | 0 | 100000 | 0.21 |
| 8 | JyotiPrasad Taparia | 228651 | 0.53 | 441736 | 0.92 |
| 9 | Aruna Taparia | 0 | 0 | 286214 | 0.59 |
| 10 | Ashutosh Taparia | 118500 | 0.27 | 449200 | 0.93 |
|  |  |  |  |  |  |
| B | Promoter Group |  |  |  |  |
| 1 | United Shippers Limited | 0 | 0 | 2200000 | 4.56 |
| 2 | Oricon Enterprises Ltd. | 6017183 | 13.91 | 200000 | 12.90 |

By order of the Board of Directors
For Kopran Limited
Sunil Sodhani
Company Secretary & Compliance Officer
FCS No: 3897
Place: Mumbai
Date: 25th December 2021

# विद्यापीठाच्या स्वायत्ततेला तिलांजली देत विद्यापीठांचे राजकीय अड्डे बनवण्याचा आघाडी सरकारचा घाट: डॉ. गजानन सानप

## विद्यापीठ विकास मंच यांचे राज्यपालांना निवेदन

**मुंबई,दि.२६ (प्रतिनिधी):** विधिमंडळाच्या सुरू असलेल्या या अधिवेशनात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यातील बदल नुकताच विधान भवनात ठेवण्यात आला. त्यानुसार, उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांना राज्यातील विद्यापीठांच्या प्र-कुलपती पदी नियुक्त करावी ही शिफारस आणि विद्यापीठांचे कुलगुरु नेमण्यासाठी राज्य सरकारची दोन नावांची शिफारस म्हणजे शिक्षणाला राजकीय अड्डा बनवण्याचा आघाडी सरकारचा घाट आहे, असा आरोप विद्यापीठ विकास मंचचे महाराष्ट्र सचिव डॉ. गजानन सानप यांनी केला. या संदर्भात महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठातील 'सिनेट' व व्यवस्थापन परिषदेतील प्रातिनिधिक सदस्यांनी राज्यपाल भगतसिंग कोशारी यांची भेट घेतली व त्यांना शासनाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायद्यात केलेल्या बदलांना, शैक्षणिक क्षेत्रातील सर्व घटकांचा विरोध, निवेदनाद्वारे देण्यात आला.

### संपूर्ण शिक्षण व्यवस्था ही सत्ताधाऱ्यांनी बेचिराख करण्याचा काळा निर्णय

पुरोगामी महाराष्ट्र म्हणून सत्तेवर आलेल्या, फुले, शाहू, आंबेडकरांचा राजकीय वारसा सांगणाऱ्या आघाडी सरकारने शैक्षणिक क्षेत्राला सुरुंग लावणारा, शिक्षण व्यवस्था सत्ताधारी राजकीय पक्षांच्या दावणीला बांधणारा काळा निर्णय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेत विधिमंडळ पटलावर मांडला. ज्याद्वारे, महाराष्ट्राच्या गलिच्छ राजकारणाची परिसीमा ओलांडली गेली असून संपूर्ण शिक्षण व्यवस्था ही सत्ताधाऱ्यांनी बेचिराख करण्याचा काळा निर्णय केला आहे, जो महाराष्ट्रातील मूल्याधिष्ठित उच्च शिक्षण नेस्तनाबूत करून शिक्षणाला राजकीय दावणीला बांधणारा असल्याचे विद्यापीठ विकास मंचने सांगितले.

सरकारद्वारे विद्यापीठाच्या स्वायत्ततेवर घाला घालण्याचा हा निर्णय असून सरकारने हा निर्णय त्वरित मागे घ्यावा त्यासाठी राज्यपाल महोदयांनी सरकारला तसे सूचित करावे, अशी मागणी विद्यापीठ विकास मंचाने यावेळी निवेदनाद्वारे राज्यपालांना केली. त्यावेळी विद्यापीठ विकास मंचचे महाराष्ट्र सचिव डॉ गजानन सानप, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्रा. डॉ. भगवान सिंग डोभाल, डॉ. निलेश ठाकरे, नितीन ठाकूर, अमोल मराठे, अमोल कळके, डॉ. रोंघे, श्रीनिवास गायकवाड, दिनेश जंगम, प्रसंजीत फडणवीस, डॉ. महेश अबाळे, डॉ. सिंकू कुमार सिंग असे महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांचे 'सिनेट' व 'मॅनेजमेंट कौन्सिल'चे प्रातिनिधिक सदस्य उपस्थित होते.

# मुंबईत दिवसभरात ९२२ 'कोरोना'बाधितांची नोंद



**मुंबई, दि. २६ (प्रतिनिधी) :** मुंबई महापालिकेतर्फे जाहीर करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार मुंबई शहरात रविवार, दि. २६ डिसेंबर रोजी ९२२ कोरोनाबाधित रुग्णांची नोंद झाली. ३२६ रुग्णांनी कोरोनावर मात केली आहे. मुंबईत आतापर्यंत कोरोनामुक्त झालेल्या रुग्णांची संख्या ७ लाख, ४७ हजार, ८६४ आहे. बरे झालेल्या रुग्णांचा दर ९७ टक्क्यांवर पोहोचला आहे.

रविवारी मुंबईत दोन रुग्णांचा मृत्यू झाला असून शहरातील सक्रिय रुग्णांची संख्या ४ हजार, २९५ इतकी आहे. रुग्णदुपटीचा दर १ हजार, १३९ दिवसांवर गेला आहे. शहरातील एकूण २२ इमारती पालिका प्रशासनातर्फे 'सील' करण्यात आल्या आहेत, अशी माहिती महापालिका प्रशासनातर्फे देण्यात आली आहे.

# दिव्यांगजनांचा नोकरीतील अनुशेष भरून काढण्याकडे राज्य सरकारने लक्ष द्यावे

## केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांची सूचना

डॉ. वीरेन्द्र कुमार
Dr. Virendra Kumar

**मुंबई, दि. २६ (प्रतिनिधी):** ''पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील केंद्र सरकार दिव्यांगजनांच्या कल्याणासाठी झटत आहे. दिव्यांगजनांना नोकरीमध्ये चार टक्के आणि शिक्षणामध्ये पाच टक्के आरक्षण मोदी सरकारने दिले आहे. मी प्रत्येक राज्यात जातो, तेव्हा दिव्यांगजनांना नोकरीमधील चार टक्के जागा भरल्यात का, याची माहिती घेताना आढळते की, दिव्यांगजनांच्या जागा पूर्ण भरलेल्या नसतात. महाराष्ट्र राज्य सरकारनेही दिव्यांगजनांचा नोकरीतील अनुशेष भरून काढावा,'' अशी सूचना रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी नुकतीच केली.

नवी मुंबई, खारघर येथे 'राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांग संस्थे'च्या प्रादेशिक केंद्राच्या नवीन सुसज्ज इमारतीचे उद्घाटन रामदास आठवले यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय राज्यमंत्री प्रतिमा भौमिक या कोलकत्त्यातून आभासी माध्यमातून उपस्थित होत्या. तसेच, खासदार श्रीरंग बारणे, प्रा. सौगत रॉय, डॉ. प्रबोध सेठ, संचालक मेजर राम कुमार, पनवेलचे उपमहापौर जगदीश गायकवाड आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

''लहान मुलांमधील दिव्यांगता लवकर ओळखली, तर त्यावर लवकर उपाय करता येतात. आता 'फिजियोथेरपी', 'स्पीच थेरपी' आदी अनेक आधुनिक उपचारपद्धतीने दिव्यांग मुलांना नवजीवन मिळत आहे. दिव्यांगांना आपुलकीने वागविले पाहिजे. त्यांच्यातील कौशल्य विकसित केले पाहिजे. दिव्यांग खेळाडू चांगली कर्तबगारी करत असून सामाजिक न्याय मंत्रालयातर्फे दिव्यांग खेळाडूंसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडाकेंद्र उभारणार आहोत,'' अशी माहिती रामदास आठवले यांनी दिली. यावेळी दिव्यांगांना उपयोगी वस्तूंचे वाटप रामदास आठवले यांच्या हस्ते झाले.

kotak® **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**
**नोंदणीकृत कार्यालय:** २७ बीकेसी, सी-२७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१.
**शाखा कार्यालय:** ४ था मजला, अॅडमास प्लाझा, सीएसटी रोड, कोलिवेरी गाव, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८.

**ताबा सूचना-कोणत्याही पूर्वग्रहाशिवाय (स्थावर मालमत्तेकरिता)**
**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ८(१) सह वाचावयाच्या परिशिष्ट IV नुसार**

**ज्याअर्थी,** निम्नस्वाक्षरीकार यांनी **कोटक महिंद्रा बँक लि.** बँकिंग नियमन कायदा, १९४९ च्या अर्थामध्ये बँकिंग कंपनी, नोंदणीकृत कार्यालय, २७बीकेसी, सी २७, जी ब्लॉक, वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू), मुंबई-४०० ०५१ आणि शाखा कार्यालय अॅडमास प्लाझा, ४ था मजला, १६६/१६, सीएसटी रोड, कोलिवेरी गाव, कुंची कुर्वे नगर, हॉटेल हरे कृष्णा जवळ, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८ चे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ (**"सरफैसी कायदा"**) अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) विनियमन, २००२ च्या नियम ८(१) सह वाचावयाच्या कलम १३(२) आणि १३(१२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून **दि. २२.०९.२०२१** रोजी मागणी सूचना जारी केली होती जी वितरित झाली नव्हती आणि दि. ७ ऑक्टोबर, २०२१ रोजी वृत्तपत्र बिझनेस स्टॅण्डर्ड आणि स्थानिक भाषेमध्ये तरूण भारत मुंबई मध्ये प्रसिद्ध झाली होती, ज्याद्वारे (**१**) **मे. मॅमिलॉन टेक्सटाईल मिल्स प्रा. लि. (कर्जदार) त्यांच्या संचालक श्री. अनिल मगलानी** पत्ताः प्लॉट क्र. १०, एमआयडीसी, सरावली, कल्याण भिवंडी रोड, कल्याण, ठाणे - ४२१३११, **तसेच येथे देखील** - सदनिका क्र. ६०१, कमला हाईट्स, प्लॉट क्र. ए३, १४ वा रस्ता, आयडीबीआय बँकजवळ, ऑफ साऊथ अॅव्हेन्यू रोड, खार (प), मुंबई - ४०००५२, **(२) सौ. पूजा मगलानी (जामीनदार)** पत्ता - सदनिका क्र. ६०१, कमला हाईट्स, प्लॉट क्र. ए३, १४ वा रस्ता, आयडीबीआय बँकजवळ, ऑफ साऊथ अॅव्हेन्यू रोड, खार (प), मुंबई - ४०००५२ **(३) श्री. भरत कोठारी (जामीनदार), (४) श्री. लिलाराम हरचंदराय रोहिरा (जामीनदार)**, पत्ताः सदनिका क्र. १६०१, तिवोली हिरानंदानी गार्डन पंचकुटीर, गणेश नगर, पवई, मुंबई ४०००७६, **(५) सौ. माया लिलाराम रोहिरा (जामीनदार)** पत्ताः सदनिका क्र. १६०१, तिवोली हिरानंदानी गार्डन पंचकुटीर, गणेश नगर, पवई, मुंबई ४०००७६, **(६) श्री. संजय लिलाराम रोहिरा (जामीनदार):** पत्ताः सदनिका क्र. १६०१, तिवोली हिरानंदानी गार्डन पंचकुटीर, गणेश नगर, पवई, मुंबई ४०००७६, **(७) श्री. अशोक लिलाराम रोहिरा (जामीनदार),** पत्ताः ८०२ राज ग्रॅन्डेऊर, हिरानंदानी हॉस्पिटलच्या मागे, हिरानंदानी गार्डन, रमाबाई आंबेडकर नगर, पवई, मुंबई - ४०००७६, **(८) सौ. अंजू संजय रोहिरा (जामीनदार),** पत्ताः सदनिका क्र. १६०१, तिवोली हिरानंदानी गार्डन पंचकुटीर, गणेश नगर, पवई, मुंबई ४०००७६, **(९) श्री. राकेश लिलाराम रोहिरा (जामीनदार)** पत्ताः सदनिका क्र. १६०१, तिवोली हिरानंदानी गार्डन पंचकुटीर, गणेश नगर, पवई, मुंबई ४०००७६, **(१०) अशोक लिलाराम रोहिरा हिंदु अविभक्त कुटुंब (जामीनदार)** पत्ताः सदनिका क्र. १६०१, तिवोली हिरानंदानी गार्डन पंचकुटीर, गणेश नगर, पवई, मुंबई ४०००७६, **(११) श्री. अनिल मगलानी (जामीनदार)** पत्ताः सदनिका क्र. ६०१, कमला हाईट्स, प्लॉट क्र. ए३, १४ वा रस्ता, आयडीबीआय बँकजवळ, ऑफ साऊथ अॅव्हेन्यू रोड, खार (प), मुंबई - ४०००५२ **तसेच येथे देखील** - सर्व जामीनदार क्र. २ ते ११ पत्ता - प्लॉट क्र. १०, एमआयडीसी, सरावली, कल्याण भिवंडी रोड, कल्याण, ठाणे - ४२१३११ यांना सूचनेमध्ये नमूद केलेली **दि. ०१.०९.२०२१ नुसारची** रक्कम **रु. ८,१३,४८,१६९.२० (रुपये आठ कोटी तेरा लाख अठ्ठेचाळीस हजार एकशे एकोणसत्तर व पैसे वीस मात्र)** व त्यासह दि. ०२.०९.२०२१ पासून पूर्ण वसुलीपर्यंत (**"थकबाकी रक्कम"**) चक्रवाढ व्याजावर करारात्मक दराने पुढील व्याज आणि त्यावरील प्रभार एवढी रक्कम सदर मागणी सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत प्रदान करण्यास सांगितले होते. उपरोल्लेखित कर्जदार / सह-कर्जदार सदर रक्कम परतावा करण्यास अयशस्वी ठरल्यामुळे, याद्वारे कर्जदार/सह-कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी उपरोल्लेखित सदर नियमनाच्या नियम ८ सह वाचावयाच्या सरफैसी कायद्याच्या कलम १३(४) अन्वये त्याला/तिला प्राप्त झालेल्या अधिकारांचा वापर करून याखाली उल्लेखिलेल्या मालमत्तेचा **दि. २१ डिसेंबर, २०२१** रोजी ताबा घेतला.

विशेषतः उपरोल्लेखित कर्जदार / सह-कर्जदार आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे खबरदार करण्यात येते की सदर मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत कोणताही व्यवहार **कोटक महिंद्रा बँक लि. शाखा पत्ता: ४ था मजला, अॅडमास प्लाझा, १६६/१६, सीएसटी रोड, कोलिवेरी गाव, कुंची कुर्वे नगर, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई - ४०००९८** यांच्या **दि. ०१.०९.२०२१ नुसारची** रक्कम **रु. ८,१३,४८,१६९.२० (रुपये आठ कोटी तेरा लाख अठ्ठेचाळीस हजार एकशे एकोणसत्तर व पैसे वीस मात्र)** व त्यासह दि. ०२.०९.२०२१ पासून पूर्ण वसुलीपर्यंत (**"थकबाकी रक्कम"**) चक्रवाढ व्याजावर करारात्मक दराने पुढील व्याज आणि त्यावरील प्रभार एवढ्या रकमेच्या प्रभारास अधीन असेल.

तारण मालमत्ता सोडविण्याकरिता, उपलब्ध असलेल्या वेळेच्या बाबतीत कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतुदीकडे कर्जदाराचे लक्ष वेधून घेतले जात आहे.

**स्थावर मालमत्तेचा तपशील**
**प्लॉट क्र. १०, एमआयडीसी सरावली, कल्याण भिवंडी रोड, कल्याण, ठाणे - ४२१३११**
**या मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे.**

सही/-
**(प्राधिकृत अधिकारी)**
**कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**
**दिनांक:** २१.१२.२०२१
**ठिकाण:** मुंबई

kotak® **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**
**कॉर्पोरेट ओळख क्र. L65110MH1985PLC038137**
**नोंदणीकृत कार्यालय:** २७ बीकेसी, सी-२७, जी ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१. (महा.)
**कॉर्पोरेट कार्यालय:** कोटक इन्फिनिटी, झोन-II, ४था मजला, इमारत क्र. २१, इन्फिनिटी पार्क, ऑफ प. द्रु. महामार्ग, गोरेगाव, मुंबई-४०० ०९७ (महा.).
**शाखा/विभागीय कार्यालय:** ४ था मजला, नियती उन्नती, झोन २, येरवडा नगर, पुणे-४११ ००६ (महा.)

**ई-लिलाव सह विक्रीकरिता जाहीर सूचना**

सर्वसाधारण जनतेस आणि विशेषतः कर्जदार/सह-कर्जदार/जामीनदारा(रां)ना याद्वारे सूचना देण्यात येते की, **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड** च्या प्राधिकृत अधिकाऱ्याकडे गहाण असलेली निम्न उल्लेखित स्थावर मालमत्ता, जिचा **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड** च्या **प्राधिकृत अधिकाऱ्याद्वारे सांकेतिक ताबा** घेण्यात आला आहे, त्यांची **"जसे आहे जेथे आहे"**, **"जसे आहे जे आहे"** आणि **"तेथे जे आहे"** तत्त्वावर विक्री करण्यात येणार आहे. निम्नस्वाक्षरीकारांद्वारे खाली दिलेल्या तपशिलाच्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता आमच्या ई-लिलाव सेवा भागिदार, **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** यांच्या वेब पोर्टल द्वारे म्हणजेच **www.c1india.com** द्वारे ऑनलाईन सादर करण्याकरिता प्रस्ताव मागविण्यात येत आहेत:

| कर्जदारांचे /जामीनदारांचे / गहाणवटदारांचे नाव | मागणी सूचनेचा दिनांक आणि रक्कम | मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|
| **कर्ज खाते क्र.: RHB2006423 आणि RHB2008386**<br>१) **सौ. संगिता विनोद जैन** (कर्जदार)<br>२) **विनोद डी. जैन** (सह-कर्जदार) | **मागणी सूचना दिनांक:** २६.०७.२०२१<br>₹ **१,०१,९२,४७६.६४**<br>(रुपये एक कोटी एक लाख ब्याण्णव हजार चारशे शहात्तर व पैसे चौसष्ट मात्र) | सदनिका क्र. ५०१, श्रीजी पलेस, सीएचएस लि., जलाराम मंदिर, ऑफ नेहरू रोड, मु. गाव चोळे, डोंबिवली (पू)-४२१ २०१, जि. ठाणे. **या मालमत्तेचे सर्व खंड आणि तुकडे.**<br>• **ताब्याचा प्रकार: • सांकेतिक** |

| राखीव किंमत | इसारा रक्कम अनामत (ईएमडी) बोली रकमेच्या १०% |
|---|---|
| ₹ **१,१५,४७,०००/-** (रुपये एक कोटी पंधरा लाख सत्तेचाळीस हजार मात्र) | ₹ **११,५४,७००/-** (रुपये अकरा लाख चौपन्न हजार सातशे मात्र) |
| **स्थावर मालमत्तांच्या पाहणीकरिता दिनांक** | **लिलावाचा दिनांक आणि वेळ** |
| दि. २३.०२.२०२२ स. ११०० वा. पासून १२०० वाजेपर्यंत | दि. २५.०२.२०२२ दु. १२०० वा. पासून ०३०० वाजेपर्यंत |
| **प्रस्ताव / ईएमडी सादर करण्याचा अंतिम दिनांक: दि. २४.०२.२०२२ रोजी सायं. ५.०० वाजेपर्यंत** |  |

**ई-लिलावाच्या महत्त्वाच्या अटी आणि शर्ती:**

(१) बोली कागदपत्रांच्या पुढील अटी आणि शर्तींनुसार आणि त्यामध्ये नमूद केलेल्या प्रक्रियेनुसार लिलाव घेण्यात येईल. बोली प्रपत्रे, ई-लिलावाकरिता ठेवण्यात आलेल्या तारण मालमत्तांचे तपशील आणि बोली अर्ज जो ऑनलाईन सादर करावयाचा आहे, त्याकरिता बोलीदारांनी आमच्या ई-लिलाव सेवा भागिदार, **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** यांच्या वेब पोर्टल म्हणजेच **www.c1india.com** येथे भेट द्यावी; **(२)** सर्व इच्छुक खरेदीदार/ बोलीदारांनी उपरोल्लेखित दिनांक आणि वेळेस ई-लिलावामध्ये भाग घेण्याकरिता वर उल्लेखिलेल्या वेब पोर्टल **https://www.bankeauctions.com** येथे त्यांचे नाव नोंदणीकृत करणे आणि स्वतःच त्यांचा युजर आयडी आणि पासवर्ड विनाशुल्क बनविणे आवश्यक आहे; **(३)** ई-लिलावावरील कोणत्याही चौकशी, माहिती, सहाय्य, प्रक्रिया आणि ऑनलाईन प्रशिक्षणाकरिता संभाव्य बोलीदार **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** आमच्या ई-लिलाव सेवा भागिदाराचा विभाग **मे. विनोद चौहान** यांना **दूर. क्र.: +९१ ७२९११९७११२४, २५, २६, मोबाईल क्र.: ९८१३८८७९३१ आणि ईमेल आयडी: delhi@c1india.com आणि support@bankeauctions.com येथे संपर्क साधावा. (४)** प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहितीनुसार, मालमत्ते/त्तांवर कोणताही बोजा नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी मालमत्ता आणि तिच्या कागदपत्रांची वर उल्लेखिल्यानुसार किंवा पूर्व परवानगीने इतर कोणत्याही दिनांक आणि वेळेस तपासणी करावी आणि त्यांनी ई लिलावास ठेवण्यात आलेल्या मालमत्ते/त्तांचे बोजा, शीर्षक आणि मालमत्तेस बाधक असणाऱ्या दावे/हक्क/देणी याबाबत त्यांची बोली सादर करण्यापूर्वी त्यांची स्वतंत्र चौकशी देखील करावी. ई-लिलाव जाहिरात केएमबीएलची कोणतेही बांधिलकी अथवा कोणतेही सादरीकरण दर्शवीत नाही. मालमत्ता **केएमबील**ला ज्ञात आणि अज्ञात सर्व विद्यमान आणि भविष्यातील बोजांसह विक्री केली जाईल. प्राधिकृत अधिकारी/प्रतिभूती धनको कोणत्याही तृतीय पक्षाच्या दावे/ हक्क / देणी यांना जबाबदार असणार नाही. **(५)** ई-लिलावामध्ये भाग घेण्याकरिता, इच्छुक खरेदीदार/बोलीदारांनी वर उल्लेखिल्यानुसार तारण मालमत्तेच्या व्याज मुक्त परतावायोग्य इसारा रक्कम अनामत (ईएमडी) **'कोटक महिंद्रा बँक लिमिटेड'** च्या नावे दिल्ली येथे देय डिमाण्ड ड्राफ्ट व त्यासह पॅन कार्ड, आधार कार्ड, निवासी पत्त्याचा पुरावा, कंपनी असल्यास मंडळाचा ठराव आणि पत्त्याच्या पुराव्याच्या स्वयं साक्षांकित प्रती वेब पोर्टल (**https://www.bankeauctions.com**) येथे सादर/अपलोड कराव्या.

कर्जदार/गहाणवटदार/जामीनदारा(रां)ना याद्वारे **सरफैसी कायद्याच्या नियम ६(२), ८(६) आणि ९(१) अन्वये** देणी पूर्णतः मुक्त करण्याची आणि वर उल्लेखिल्यानुसार देणी व त्यासह आजवरचे व्याज आणि खर्च या सूचनेच्या दिनांकापासून तीस दिवसांमध्ये देण्याची **वैधानिक ३० दिवसांची** सूचना देण्यात येत आहे, ज्यामध्ये अयशस्वी ठरल्यास तारण मालमत्ता वर उल्लेखिलेल्या अटी आणि शर्तींनुसार विक्री करण्यात येईल. इंग्रजीमधील आणि स्थानिक भाषेतील वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध झालेल्या विक्री सूचनेमध्ये काही विसंगती असल्यास, अशा प्रकरणात स्थानिक भाषेतील वृत्तपत्रास इंग्रजी वृत्तपत्रातील जाहिरात अधिग्रहित करेल आणि ती अंतिम प्रत मानली जाईल व त्यामुळे अस्पष्टता दूर होईल. जर कर्जदारा(रां)नी जामीनदारा(रां)नी/गहाणवटदारा(रां)नी प्रतिभूती धनकोस देय असलेली रक्कम विक्री दिनांकापूर्वी पूर्णतः भरणा केल्यास विक्री थांबविण्यात येईल.

प्रतिभूती धनको कर्जदारांना जामीनदारांना/गहाणवटदारांना स्पीड/नोंदणीकृत पोस्ट द्वारे विक्री सूचना पारित करेल. जर ती कोणत्याही पक्षकाराद्वारे स्वीकारली नाही, तर ही विक्री सूचनेची प्रसिद्धी त्या सेवेकरिता पर्यायी मार्ग मानला जाईल

विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तीकरिता, कृपया आमच्या अधिकृत वेबसाईट **https://www.kotak.com/en/bank-auctions.html** ला भेट द्या किंवा बँकेच्या उपरोल्लेखित विभागीय कार्यालयात **प्राधिकृत अधिकारी श्री. समीर ठक्कर यांना ९८३३९४९८९९** येथे संपर्क साधावा.

**विशेष सूचना:** ई-लिलाव **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड (केएमबीएल)** यांच्या वतीने आमचे सेवा पुरवठादार, **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** यांच्याद्वारे पूर्व-निर्दिष्ट दिनांकास घेण्यात येईल व बोलीदार त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या स्वतःच्या घरून/कार्यालयातून /त्यांच्या बोलीच्या ठिकाणावरून राखीव किंमतीच्या वर बोली लावतील. इंटरनेट जोडणी आणि इतर आवश्यक बाबींची पूर्तता बोलीदारांनी स्वतःच करावयास हवी. कृपया नोंद घ्यावी की, इंटरनेट जोडणी अयशस्वी झाल्यास (कोणत्याही कारणास्तव) अशा आपत्कालिन परिस्थितीस **केएमबीएल** किंवा **मे. सी१ इंडिया प्रा. लि.** जबाबदार नसेल आणि ती पूर्णपणे बोलीदाराची जबाबदारी असेल. अशा आकस्मिक परिस्थितीचा सामना करण्याकरिता, बोलीदारांनी सर्व आवश्यक व्यवस्था/आवश्यक पर्यायी व्यवस्था करून ठेवावी, जेणेकरून त्यांना अशा परिस्थितीला सामोरे जाता येईल आणि तरीही ई-लिलावात यशस्वीरित्या भाग घेता येईल. तथापि, बोलीदारांना विनंती आहे की, अशी कोणतीही बिकट परिस्थिती टाळण्याकरिता त्यांनी बोली लावण्याकरिता/त्याची/तिची बोली सुधारण्याकरिता शेवटच्या क्षणाची वाट पाहू नये.

**ठिकाण:** मुंबई, महाराष्ट्र
**दिनांक:** २७.१२.२०२१
सही/- **प्राधिकृत अधिकारी**
**कोटक महिंद्रा बँक लिमिटेडकरिता**